# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com


दिनांक : ०७/१२/२०२३

# प्रेसनोट

उल्हासनगर महानगरपालिकास्तरीय "उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम" CTF दिनांक ०५/१२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजता स्थायी समिती सभागृह, उल्हासनगर महानगरपालिका येथे मा. श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त, (अतिरिक्त कार्यभार) उल्हासनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस मा.श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त (अतिरिक्त कार्यभार), डॉ. सुभाष जाधव -मा.उप-आयुक्त (वै.आ.वि), डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकिय आरोग्य अधिकारी, डॉ. किशोर चव्हाण, SMO, डॉ. विद्या चव्हाण, शहर कार्यक्रम व्यवस्थापक, वैद्यकीय अधिकारी, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र- १ ते ६, उमपा, श्री. डी. कचरे, लिपीक- ICDS इ. सदस्य उपस्थित होते.

सदर बैठकीची सुरूवात मा. डॉ. सुभाष जाधव, उप-आयुक्त (वै.आ.वि) यांनी केली. डॉ. मोहिनी धर्मा, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, यांनी प्रस्तावना सादर करत उल्हासनगर महापालिका कार्यक्षेत्रात पल्स पोलिओ मोहिमे करिता एकुण ५७९१४ लाभार्थी असून एकुण २९५ बुथ व गृहभेटी साठी १७७ टीमचे नियोजन करण्यात आले आहे, अशी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर डॉ. किशोर चव्हाण, सर्व्हेलन्स मेडिकल ऑफिसर (SMO) यांनी "उपराष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम " या अभियानाची संपूर्ण रूपरेषा Power Point Presentation द्वारे उपस्थितांना दिली.

सदर बैठकीत बैठकीचे अध्यक्ष मा. श्री. जमीर लेंगरेकर, प्रशासक तथा आयुक्त, (अतिरिक्त कार्यभार) यांनी खालीलप्रमाणे चर्चा करून सूचना दिल्या.

१. सोशल मिडियाच्या माध्यमातून व धर्मगुरू यांच्या मार्फत जास्तीत जास्त प्रमाणात पल्स पोलिओ मोहिमेची प्रसिद्धी करावी.
२. आपला दवाखाना येथे पोलिओ लसीकरणाचे बुथ लावणे.
३. नविन नियुक्त केलेल्या आशांना लसीकरण मोहिमेसाठी सहभागी करणे.
४. एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी, यांना सदर मोहिमेत सहभागी होण्यास माहिती देणे.
५. शैक्षणिक संस्थाना सदर मोहिमेत (NSS) यांना सहभागी करून घेणे.
६. महिला बाल विकास विभाग यांना मनुष्यबळ मिळण्यासाठीचे नियोजन करणे.
७. महिला बचत गट यांना मनुष्यबळ मिळण्यासाठी नियोजन करणे
८. सदर मोहिमेची जनजागृती अति उत्कृष्ट करण्यासाठी मराठी व सिंधी व्यतीरिक्त हिंदी बॅनर छपाई करून जनजागृती करणे.
९. वैद्यकिय अधिकारी, ना.प्रा.आ. केंद्र १ ते ६ सर्व यांनी ILR व Deep Freezer ची Backup Plan ची पडताळणी करणे.
१०. सदर मोहिमेच्या बुथच्या दिवशी ८०% च्या वर लाभार्थ्यांना लाभ मिळावा याची दक्षता घेणे.
११. स्थलांतरित वस्तीतील मुलांचे लसीकरण पूर्ण झाले किंवा नाही याचा आढावा घेणे.

तसेच "पल्स पोलिओ लसीकरण मोहिम " हे अभियान यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक सर्व विभागांनी योग्य सहकार्य करणेबाबत सर्व समिती सदस्यांना विनंती करण्यात आली व उपस्थित सर्व समिती सदस्यांचे आभार मानुन डॉ. विद्या चव्हाण मॅडम यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे घोषित केले.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनॅलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.